MHBI160022132022

**नि.दि.दावा क्र.१४३१/२०२२**
**संगिता वि. कल्पना**

## आदेश नि.४२ वर

प्रस्तुतचा अर्ज वादीने सी.पी.सी.चे ऑर्डर ६ रूल १७ अन्वये दावा दुरुस्तीसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१ तर्फे वकीलांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

२. वादीने प्रस्तुत अर्जात नमूद केले आहे की, त्यांना दाव्याच्या विनंती मध्ये परिच्छेद क्र.२अ म्हणून वादग्रस्त मिळकतीचे गैरअर्जदार यांनी कसल्याही प्रकारे हस्तांतरण, गहाण, दान, कर्ज, बोजा, बक्षीस, खरेदी विक्री करु नये अशा प्रकारचा निरंतर मनाई हुकूमाचा आदेश वादीच्या हक्कात व प्रतिवादीच्या विरुध्द करावा, अशी दाव्यामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. प्रस्तुतचा दावा हा जमीन मिळकतीबाबत असल्याने त्यामध्ये वादीचे हक्क गुंतलेले आहेत. त्यामुळे वादीने अर्जात नमुद प्रमाणे दुरूस्ती करावयाची मागणी केली आहे.

३. प्रतिवादीने त्यांचे म्हणण्यामध्ये कथन केले आहे की, प्रस्तुत अर्ज कायदाबाहय असून सूचित दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप बदलत आहे, प्रतिवादी क्र.१ ने दावा दाखल होण्यापूर्वीच जमीन विक्री केलेली आहे व त्या लोकांना वादीने दुरुस्ती आधारे समाविष्ट केलेले आहे. म्हणून प्रतिवादीने वादीचा अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

४. अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. युक्तिवादानंतर माझे विचाराधीन आलेले मुददे व त्यावरील माझे निष्कर्ष विवेचनासह खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी हे मागितलेली सुचित दुरुस्ती मिळण्यास पात्र आहेत काय? | होय |
| २. | काय आदेश? | अंतिम आदेशान्वये |

## कारण मिमांसा

**मुद्या क्र. १ करिता**

५. वादीने प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी दाखल केलेला आहे. वादीने कथन केले आहे की, त्यांना दाव्याच्या विनंती मध्ये परिच्छेद क्र.२अ म्हणून वादग्रस्त मिळकतीचे गैरअर्जदार यांनी कसल्याही प्रकारे हस्तांतरण, गहाण, दान, कर्ज, बोजा, बक्षीस, खरेदी विक्री करु नये अशा प्रकारचा निरंतर मनाई हुकूमाचा आदेश वादीच्या हक्कात व प्रतिवादीच्या विरुध्द करावा, अशी दाव्यामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. वादीने दाव्यात मनाई हुकूमाचा अर्ज हा दाखल केलेला आहे. त्यामध्ये वादीने त्या अनुषंगीक सदरहू मागणी ही केलेली आहे. वादीने त्या अनुषंगीक अंतिम मागणी ही दाव्याच्या विनंती सदरामध्ये करावयाची असल्याचे दिसून येत आहे. वादीने मागितलेली दुरुस्ती पाहता ती दाव्याच्या अनुषंगीक असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. वादीचा प्रस्तुतचा अर्ज जरी मंजूर केला तरी प्रतिवादींना आपले म्हणणे दाखल करण्याची मुभा असणार आहे. वादीने अर्जात मागितलेली दुरुस्ती पाहता दाव्याच्या स्वरुपात बदल होणार असल्याचे दिसून येत नाही. प्रस्तुत वादीची दुरुस्ती मान्य केल्यास नक्कीच त्याचा फायदा हा दाव्याच्या न्यायनिवाड्याकरीता होणार असल्याचे दिसून येत आहे. प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास त्याचा फायदा दाव्याच्या

उलगडयाकरिता आवश्यक होणार आहे. प्रस्तुत अर्जान्वये वादी हा मनाई हुकूमाची मागणी ही दाव्याच्या विनंती सदरामध्ये करु पाहत आहे. त्यामुळे प्रस्तुतची मागणी ही मंजूर होणेस पात्र आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये अदयाप पुरावा सुरु झालेला नाही. त्यामुळे तो मंजूर होण्यास पात्र असल्याचे दिसून येते. वादी प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यासाठी केलेला विलंब पाहता सदर वादीवर अर्ज खर्च ठेवल्यास उददेश सफल होईल या निष्कर्षास मी येत आहे. अर्ज खर्च हा दाव्याची सध्याची स्थिती, लागलेला उशिर यावर ठरवणे उचित होईल. प्रतिवादीने लेखी कैफियत दिली नसल्यामुळे ते खर्चास पात्र नाहीत. त्यामुळे मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा अर्ज रक्कम रु.२००/– खर्च लावून मंजुर करण्यात येतो.

२. वादीने सदरचा खर्च पुढील तारखेस किंवा त्याच्या आत सरकार जमा करावा.

३. वादीने सदर खर्च दिल्यानंतर प्रस्तावित दुरुस्ती करावी.

४. वादी व प्रतिवादींनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

Sd/–

(अ.त्रिं.मनगिरे)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर
शिरुरकासार.

दिनांक १३/०२/२०२४

“I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order”.

Sd/-
[P.B. Kusumkar]
Stenographer Grade-3

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 13/02/2024 |
| Transcribed on | : | 13/02/2024 |
| Checked & signed on | : | 13/02/2024 |